नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 05/01/2021 (मंगळवार)
(सकाळ)

---

## अवैधरीत्या मोहाफुल गावठी दारु बाळगणाऱ्या आरोपीविरूद्ध कार्यवाही

पो.स्टे. केळवद :- दिनांक 04/01/2021 रोजी केळवद पोलीसांना गुप्त माहिती मिळाली की, येथे काही इसम नांदागोमुख शिवार येथे गावठी मोहाफुल हातभट्टीची दारू गाळण्याचा अवैधरीत्या व विनापरवाना व्यवसाय करीत आहे. अशा मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे दिनांक 04/01/2021 चे 14.30 वा. दरम्यान मौजा नांदागोमुख शिवारातील शेतात पो. स्टे. केळवद पोलीसांनी धाड टाकली असता आरोपी नामे- दिलीप संतोष राजपूत, रा. पारधीबेडा तिडंगी केळवद हा पोलिसांना पाहून पळुन गेला. घटनास्थळावरून मोहाफुल हातभट्टीची गावठी दारू गाळण्याच्या उपयोगाचा 1600 लिटर मोहाफुल सडवा, 120 लिटर मोहाफुल रसायन सडवा आणि 100 किलो मोहाफुल व इतर साहित्य असा एकुण 1,76,700/- रूपयाचा मुद्देमाल आरोपीतांच्या ताब्यातून जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी पोलीस स्टेशन केळवद येथे आरोपीविरुध्द महाराष्ट्र दारूबंदी अधिनियम अन्वये गुन्हे नोंद करण्यात आले असुन सहा आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सफौ कामठे हे करीत आहे.

सदरची कार्यवाही ही नागपुर (ग्रामिण) पोलीस अधिक्षक श्री. राकेश ओला, अप्पर पोलीस अधिक्षक श्री. राहुल माकणीकर यांच्या मार्गदर्शनाखाली पो. स्टे. केळवद चे ठाणदार पोलीस निरीक्षक श्री. दिलीप ठाकुर, सफौ श्री. अमरदिप कामठे, पोलिस शिपाई धोंडुतात्या देवकते, होमगार्ड सैनीक निलकान्त बोन्द्र, ईश्वर गाडगे यांनी यशस्वीरीत्या पार पाडली आहे.



पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर